SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM I EXAM (2025-26)**

**Class:** X **Section:** A **Subject: Marathi( 009 )**

**Date: 30 /08/2025** **Total Marks: 80**

**Roll No. : ____** **Time: 3 Hours**

**General Instructions :**

1. **The Question Paper consists of Four sections- Reading and Comprehension, Literature based questions and Grammar**
2. **All questions are compulsory.**
3. **Read the question carefully before attempting it.**

## विभाग –'अ '- वाचन व आकलन -गुण १५

**प्रश्न 1 ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ८ ) गुण ८**

भारत ही एक लोकशाही प्रधान, कृषिप्रधान आणि विविध उद्योगांनी समृद्ध असलेली अर्थव्यवस्था आहे. भारताची अर्थव्यवस्था मुख्यतः तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे – कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्र.

कृषी क्षेत्र हे भारताचे पारंपरिक आणि प्रमुख क्षेत्र आहे. देशातील बहुतांश लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. अन्नधान्य, डाळी, कापूस, साखर, तांदूळ, गहू ही मुख्य पिके आहेत. कृषीवर आधारित अनेक लघुउद्योग ग्रामीण भागात चालतात.

उद्योग क्षेत्रात वाहननिर्मिती, यंत्रसामग्री, औषधनिर्मिती, वस्त्रउद्योग, पोलाद निर्मिती आदी क्षेत्रांचा समावेश होतो. भारताने मागील काही दशकांत औद्योगिक विकासात मोठी प्रगती केली आहे.

सेवा क्षेत्र भारताच्या GDP मध्ये मोठा वाटा उचलत असून, त्यात बँकिंग, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, माहिती तंत्रज्ञान (IT) यांचा समावेश होतो. भारताची IT सेवा जगभर प्रसिद्ध आहे.

शेअर बाजार, सरकारची आर्थिक धोरणे, परदेशी गुंतवणूक, निर्यात-आयात व्यवहार, हवामान व जागतिक घडामोडी यांचा अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. अर्थव्यवस्था बळकट असेल तर देशाचा विकास वेगाने होतो आणि नागरिकांचे जीवनमान उंचावते.

**A ) उतारा वाचून त्या आधारे खालील उत्तरे पर्यायांमधून निवडा . ( कोणतेही 3 ) ( 3 x 1=3 )**

I ) देशाचा विकास वेगाने होतो आणि नागरिकांचे -------- उंचावते.

a ) राहणीमान b ) जीवनमान c ) अभिमान d ) गौरवमान

II ) देशातील बहुतांश लोक आजही --------- अवलंबून आहेत.

a ) उधोगधंद्यावर b ) शेतीवर c ) एकमेकांवर d ) नोकरीवर

III ) भारताने मागील काही ------------ औद्योगिक विकासात मोठी प्रगती केली आहे.

a ) दशकात b ) शतकात c ) एककात d ) कश्यातच नाही

IV ) सेवा क्षेत्र भारताच्या ---------- मध्ये मोठा वाटा उचलत असतो .

a ) GDP b ) IT c )DPG d ) ITI

**B ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा .( कोणतेही 3 )** **( 3 x 1=3 )**

I ) अर्थ व्यवस्थेवर परिणाम करणारे घटक कोणते आहेत ?
II ) भारताची कोणती सेवा जगभर प्रसिद्ध आहे.
III ) भारताची अर्थव्यवस्था मुख्यतः कोणत्या तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे ?
IV ) उद्योग क्षेत्रात कोण – कोणत्या क्षेत्रांचा समावेश होतो.

**C ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा . ( कोणतेही 1 )** **( 2 x 1 =2 )**
I ) भारत देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवताल ते लिहा .
II ) भारतातील कृषी व्यवसायाबद्दल 3 ते 4 वाक्यात माहिती लिहा .

**प्रश्न 2) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ७ )** **गुण ७**

स्वाभिमान हा माझा श्वास,
जगण्याची ही खरीच आस।
झुकून न मी कधी चाललो,
सत्यासाठी उभा राहिलो।।

नसे मला मखमली रस्ता,
खडतर वाटच माझा दोस्त।
पाठीशी असतो आत्मविश्वास,
त्यामुळेच असतो मी खास।।

जरी असतील संकटांचे डोंगर,
मनामध्ये असतो आत्मतेज भरपूर।
कधी न मागतो दया कुणाची,
माझी साथ माझीच छाया खरी।।

मी गरीब असो वा श्रीमंत,
स्वाभिमान राखतो मी प्रत्येक क्षणांत।
माझं जगणं माझ्या कर्तृत्वावर,
नसे मला गरज दुसऱ्याच्या वरवर।।

मनात असो प्रामाणिक विचार,
तेच देतात खऱ्या आयुष्याला आकार।
कधीही न वाकवू देतो मान,
हाच असतो खरा स्वाभिमान।।

**A ) उतारा वाचून त्या आधारे खालील उत्तरे पर्यायांमधून निवडा . ( कोणतेही 3 )** **( 3 x 1=3 )**
I ) कवितेचा मुख्य विषय काय आहे ?
a ) मान b ) स्वाभिमान c ) संकट d) पैसा
II ) कवीच्या पाठीशी कोण उभा आहे ?
a ) आत्मविश्वास b ) छाया c ) दोस्त d ) आत्मतेज
III ) कवीच्या मते त्यांच्या आयुष्याला कोण आकार देत आहेत ?
a ) प्रामाणिक विचार b ) स्वाभिमान c ) श्वास d ) दोस्त

**B ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा .( कोणतेही 4 )** **( 4 x 1=4 )**

I ) कवितेमध्ये रस्ताच्या उल्लेख काय म्हणून केला आहे ?

II ) कवीच्या मते डोंगर कसे आहेत ?

III ) कवीच्या मते खरा स्वाभिमान कसा आहे ?

IV )" खडतर " शब्दाचा समानार्थी शब्द लिहा .

V ) " माझी साथ माझीच छाया खरी" वाक्यातील विशेषण ओळखा व लिहा .

## विभाग 'ब'-व्याकरण - गुण २०

**प्रश्न 3 . A ) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ४ )** **( 4 x 1 =4 )**

i ) भिकाऱ्याला मी एक सदरा दिला ,शिवाय त्याला जेऊ घातले ( उभयान्वयी अव्यय ओळखा व लिहा )

a ) जेऊ घातले b ) भिकाऱ्याला c ) शिवाय d ) एक

ii ) सरला माधुरी पेक्षा उंच आहे . ( शब्दयोगी अव्यय ओळखा व लिहा )

a ) उंच b )पेक्षा c ) आहे d ) )पेक्षा

iii ) रस्त्यातून जाताना <u>जपून</u> चालावे . (अधोरेखित शब्दाची जात व ओळखा )

a ) क्रियाविशेषण b ) क्रियापद c ) विशेषण d ) नाम

iv ) खालील पैकी योग्य विधान कोणते ?

a ) क्रियाविशेषण म्हणजे नामाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द

b ) क्रियाविशेषण म्हणजे क्रीयापदाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द

c ) क्रियाविशेषण म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द

d ) क्रियाविशेषण म्हणजे क्रियांना जोडणारा शब्द

v ) खालील गटात न बसणारा शब्द कोणता ?

a ) नदी b ) गणेश c ) गाव d ) ही

**B ) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ३ )** **( 3 x 1 =3 )**

i ) मधु लाडू खात असते .( वाक्याचा वर्तमान काळ करा )

ii ) मी निबंध लिहिणार .( वाक्याचा भूतकाळ करा )

iii ) तो बहुदा घरी असावा . .( वाक्याचा भविष्यकाळ करा )

iv ) मी खात्रीने पास होईल .(वाक्याचा काळ ओळखा व लिहा )

**C ) दिलेल्या सूचनेप्रमाणे वाक्य रुपांतर करा . ( कोणतेही ३ )** **( 3 x 1 =3 )**

i ) भिकाऱ्याला शाली कश्या शोभतील . ( विधानार्थी वाक्य करा )

ii ) पंधरा रंग कोणाला आवडत नाही .( प्रश्नार्थी वाक्य करा )

iii ) तो देखावा खूप सुंदर आहे .( उद्गारार्थी वाक्य करा )

iv ) सुट्टीत भरपूर वाचन करावे .( आज्ञार्थी वाक्य करा )

**D ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी भिन्न लिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा लिहा.

a ) थोरला b ) साहेब c ) वृद्ध d ) झाड

II ) लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा .

a ) पगडी b ) फेटा c ) टोप d ) मुकुट

III ) पुढीलपैकी नपुसकलिंगी शब्द कोणता ते ओळखा .
a ) घर    b ) पेन्सिल    c ) पिशवी    d ) चेंडू

**प्रश्न 4.A ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी समान अर्थाची जोडी कोणती ते ओळखा .
a ) धाडस – पराक्रम    b ) दिन – रात्र    c ) अहोरात्र – संपर्ण रात्र    d ) जमुना – गंगा

II ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा .
a ) मुख    b ) सोंड    c ) वदन    d ) तोंड

III ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा .
a ) नदी    b ) सरिता    c ) वसुंधरा    d ) वाहिनी

**B ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी विरुद्धार्थी शब्दाची जोडी कोणती ते ओळखा .
a ) अनपेक्षित x उपेक्षित    b ) किमान x कमाल
c ) उलट x चांगले    d ) स्त्री x बाई

II ) " निशस्त्र " शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा .
a ) शस्त्र    b ) सशस्त्र    c ) बिनशस्र    d ) हत्यार

III ) " जन्म " शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा .
a ) जीवन    b ) मृत्यू    c ) आयुष्य    d ) वाढदिवस

**C ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी एक वचनी शब्द कोणता ते ओळखा .
a ) टेबल    b ) खिडकी    c ) पंखा    d ) पुस्तके

II ) <u>तो</u> गाणे गाऊ लागला .- अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा

III ) तारीख – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा

**D ) सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही २)** **( 2 x 1 =2 )**

I ) खालील पैकी समास प्रकारच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?
a ) खरे खोटे    b ) बरेवाईट    c ) तीनचार    d) हरिहर

II ) " कृष्णार्जुन "समासाचा विग्रह करून लिहा

III ) " बहिण भाऊ " शब्दाचा समास ओळखा
a ) इतरेतर द्वंद    b ) वैकल्पिक    c ) समाहार द्वंद्व    d ) अव्ययीभाव

## <u>विभाग 'क' पाठ्यपुस्तक आधारीत - गुण ३०</u>

**प्रश्न 5 . A ) एका वाक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही ३ )** **( 3 x 1 =3 )**

I ) डॉ माशेलकर यांना लहानपणीच माशेल का सोडावे लागले ?

II ) अब्दुल कोणकोणत्या दिवशी तपोवनात जात असत ?

III ) कथेची दोन वैशिष्टे लिहा ?

IV ) अब्दुलमियाला बांगड्यांचा धंदा का सोडवत नव्हता ?

V ) पावडे काकांचा चेहरा का पडला ?

**B ) रिकाम्या जागा भरा . ( कोणतेही ३ )** **( 3 x 1 =3 )**

I ) कवितेला गाण्यात रुपांतर करणारा ---------

a ) दिग्दर्शक b ) संगीतकार c ) साहित्यकार

II ) वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत लेखकाला ----------रहाव लागल .

a ) दप्तरा शिवाय b ) चापलांशिवाय c ) आईशिवाय

III ) एक लिटर पेट्रोल जळते तेव्हा ------------

a ) एक किलो कार्बन हवेत सोडला जातो

b )तीन किलो कार्बन हवेत सोडला जातो

c ) अडीच किलो कार्बन हवेत सोडला जातो )

Iv ) सभा संमेलने गाजवणारे कवी ---------

a ) नारायण सुर्वे b ) पु ल देशपांडे c ) रा ग जाधव

**C ) थोडक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही १)** **( 3 x 1 =3 )**

i ) " भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची उर्जा " या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा .

ii ) तापण फनफनलीय धरती ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा .

iii ) तंत्रज्ञानाची जोड देऊन अब्दुलचा मुलगा बांगड्यांचा व्यवसाय कसा वाढू शकेल या विषयी तुमचे विचार स्पष्ट करा .

**D ) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा खालील वाक्यांमध्ये योग्य ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा .**

**( 5 x 1 =5 )**

**(** कमी पणाचे वाटणे / उसंत मिळणे / जीवन समर्पित करणे / वरमने / वाव नसणे

I ) शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य दिले .

II ) शिक्षकांनी मिनू ला रागावल्यावरती ती शांत झाली .

III ) आपल्या कडे खेळांना पाहिजे तेवढी संधी मिळत नाही .

IV ) अजयला कचरा उचलणे खूप हीन दर्जाचे वाटते

V ) बाबांना ऑफिसच्या कामातून वेळ मिळत नाही .

**प्रश्न 6 .A ) एका वाक्यात उत्तरे लिहा .( कोणतेही ४ )** **( 4 x 1 =4 )**

I ) " दोन दिवस" कवितेत चंद्राला कोणती उपमा दिली आहे ?

II ) "दोन दिवस " या कवितेच्या कवीच्या हाताची विशिष्टे लिहा .

III ) कवीला कष्टाचे सामर्थ अपुरे केव्हा वाटते ?

IV ) " दोन दिवस" कवितेत दरवेळी झोतभट्टीत शेकणारे काय आहे ?

V ) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते ?

**B ) रिकाम्या जागा भरा .** **( 4 x 1 =4 )**

I ) कवितेतल दिन - दुबळे म्हणजे ---------

a ) पैसे नसणारे

b ) शारीरिक दृष्ट्या सक्षम नसणारे

c) सैनिकाच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय

II ) " दोन दिवस" कवितेतील कवीचा मित्र -----------

a )हात b ) अश्रू c ) दु:ख

III ) ---------- म्हणे मेघा जैसा विनवितो चातक तैसा .

a ) तुका b) नामा c ) ज्ञाना

IV ) कवीचे हात ---------- तारण राहिले आहेत .

a )दारिद्र्याकडे b) श्रीमंतांकडे c ) कष्ट करयांचे

**C ) संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा . ( कोणतेही १ )** **( 3 x 1 =3 )**

I ) " आशा असंख्य ज्योतींची तुझ्या मागून राखण " या ओळीतील भावार्थ स्पष्ट करा .

II ) " दोन दिवस " कवितेत व्यक्त झालेल्या कष्ट कर्यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा .

**प्रश्न 7 A ) एका वाक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही ५ )** **( 5 x 1 =5 )**

I ) B .A.R.C चे पूर्ण रूप लिहा .

II ) भारतातील अनुसंशोधनाचा पाया कोणी घातला ?

III ) लेखक बार्क मध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाले तेव्हा त्यांना कोणत्या प्रक्रियेवर काम करायला लागले ?

IV ) " आधी केले मग सांगितले " एक ते दोन वाक्यात स्पष्ट करा .

V ) " स्काय इज द लिमिट " परीस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ?

VI ) प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणाम कारक असते ते स्पष्ट करा .

## विभाग 'ड' लेखन - गुण १५

**प्रश्न 8 .A ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १२० - १५० शब्दात निबंध लिहा** . **( 5 x 1 =5 )**

I ) मी पाहिलेली आग

प्रचंड आवाजाने जाग – धावपळ – भयाण चित्र – आगीचे रौद्र वर्णन – लोकांचे सल्ले – अग्निशमन दल – सेवाभावी वृत्ती - --------

II ) वृक्षाचे मनोगत

जन्म – वाढ – अडचणी – वृक्षतोड – सावली –फळे – लाकडे – तुमची प्रतिक्रिया......

III ) भविष्यातील शाळा कशी असेल ?

तुमचे मत – शाळेचे वर्णन – तुमची इच्छा – अभ्यास क्रम बदल – पद्धती – नूतनी करण.........

**किंव्वा**

**खाली दिलेले मुद्दे वाचा व त्याआधारे कोणतीही एक कथा पूर्ण करा .( शीर्षक व तात्पर्य आवश्यक )**

I ) एक जंगल - प्राण्याची शिकार –भांडण – हल्ला – एकी – भूक – बैल – सिंह

II ) निरंजन एक अनाथ मुलगा – मावशीने सांभाळ करणे – कष्टमय जीवन – शिक्षणाची आवड – भडसावळे गुरुजी – नागरिक शास्त्राची आवड –रोजचा प्रवास – घातपात – नजर पडणे – समजदारी – शाबासकी -----

**B ) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक )** **( 5 x 1 =5 )**

I ) तुमच्या लोहगाव भागात वारंवार विजपुरवठा खंडित होतो ,यासंबंधीचे एक नागरिक म्हणून महानगर पालिका अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहा .

**किंवा**

II ) जगद्गुरू शाळेमध्ये " कलासागर कार्यक्रम " आयोजित करण्यात आला आहे . पण त्यासाठी लागणारे तिकीट समाप्त झाल्यामुळे मुख्य अधिकाऱ्यास त्यांची मागणी करणारे पत्र लिहा .

**C ) दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन करा ( कोणतेही एक )** **( 5 x 1 =5 )**

I ) " नवीन मोबाईल विक्री " विशेष सवलत यावर जाहिरात तयार करा

II ) जुनी सायकल विकायची आहे ,यावर जाहिरात तयार करा